ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : डॉ. वॉन्लेस

लेखक : त्र्यंबक नारायण साठे

प्रकाशक : डॉ. सी. ई.व्हेल, मिरज

प्रकाशन वर्ष : १९३३

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

# डॉ० वॉन्लेस.

लेखक,

त्र्यंबक नारायण साठे,

कोटाजंक्शन, ( राजपुताना. )

---

प्रकाशक,

डॉ० सी. ई. व्हेल, एम्.डी.एफ्.ए.ई.एस्.

फिजिशन्. इन्चार्ज अमेरिकन प्रसबिटेरियन मिशन हॉस्पीटल

मिरज. एस्.एम्.सी.

किंमत २ आणे.

## तारीख २४ मार्च १९३३ रोजीं झालेल्या वॉन्लेस मेमोरियल सर्व्हिसकरितां खास पाठविलेला–

# चरित्रात्मक निबंध.

## ख्रिस्तवासी सर डॉ० वुईल्यम वॉन्लेस,

M. D., F. A. C. S. Kt.

### मित्रहो:–

आजच्या प्रसंगी भाषण करणेसाठीं मला स्मरण पूर्वक व अगत्य पूर्वक निमंत्रण केल्याबद्दल मी मिरजेचे "युनाइटेड चर्च ऑफ नॉर्दन इंडिया मिरज मंडळीचे" चर्च कमेटीचा अत्यंत आभारी आहे.

दिवंगत मित्राबद्दलच्या चार गोष्टी स्नेही मंडळीत सांगाव्या हें आह्मां वृद्धांचे कामच आहे व सर विल्यम यांचा जुना मित्र ह्मणून आपला सर्वांचा माझेवर तसा हक्कही आहे. तो हक्क आपण योग्य रीतीनें बजावला याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. प्रथमत: मी समक्ष येउं न शकल्या-बद्दल आपली माफी मागतो व माझे ७३ वर्षे वय, प्रकृतिमान व हजार मैलांचा प्रवास लक्षांत घेऊन आपण माझ्या गैर हजेरीबद्दल रागावणार नाहीं असा भरंवसा आहे. डॉ० वानलेस हे अमेरिकेतील प्रेस बिटेरियन मिशनतर्फे या देशांत प्रथम १८८९ मध्यें सांगलीस आले. त्यावेळच्या

मिशनरींत सांगलीस रे. ग्रॅहम, रे. गोहीन [डॉ. गोहीन यांचे वडील] ही मंडळी होती. तेथें राहून मराठी भाषेचा बोलण्या चालण्यापुरता अभ्यास करून महाराष्ट्राची पहाणी करून त्यांनीं आपल्या वैद्यकीय कार्यासाठीं मिरज पसंत केले.

मिरज पसंत करणेचें कारण मिरजेचें उत्कृष्ट हवापाणी, आजूबाजूस १०० मैलाचे कक्षेंत गरीब रोग्यासाठीं योग्य उपचार होणाऱ्या हॉस्पिटलची उणीव व विशेषतः मिरजेचें अधिपती श्रीमंत सर गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन यांचे सहानुभुतिपर प्रोत्साहन व त्यावेळचे कार्यकुशल स्टेट कारभारी रा० ब० कल्याण सिताराम चित्रे यांचे निरलस सहाय हें होय.

मंगळवार पेठेंतील एका लहानशा दुकानांत प्रथम त्यांनीं आपला दवाखाना सुरूं केला व सांगलीस राहून रोज सकाळ संध्याकाळ सायकलीवरून येऊन ते हा दवाखाना चालवीत असत. लोक त्यावेळीं त्यांस पाद्रीसाहेब ह्मणत.

वॉनलेससाहेब त्यावेळीं कसे दिसत असतील याची प्रत्यक्ष कल्पनाअसलेली माणसे आजच्या समाजात एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकीही नसतील.

डॉ. वॉनलेस त्यावेळीं ऐन तारुण्याच्या उमेदीत होते त्यानी दाढी राखली होती त्यामुळें त्यांचा चेहरा रुबाबदार दिसत असे. या दवाखान्याचा लौकिक हळूहळूं वाढूं लागला व त्यानीं आपणासमोर दिसत

असलेल्या प्रचंड हॉस्पीटलच्या इमारती ज्यावर आहेत ती जागा सन-१८९२ मध्यें मिशन फंडामधून खरेदी केली. या जागेवर प्रथम ५६ बेडूचे हॉस्पीटल बांधून त्यांचा उद्‌घाटण समारंभ अमेरिकन स्वातंत्र्यदिनाचे मुहूर्तावर तारीख ४ जुलई १८९३ रोजीं श्रीमंत सर बाळासाहेब पटवर्धन चीफ ऑफ मिरज यांचे हस्तें मोठ्या थाटाने झाला.

येथून त्यांच्या खऱ्या कामगिरीस सुरवात झाली. त्यांचे कार्याचा व्याप उत्तरोत्तर वाढत जाऊन आज आपणास दिसत असलेल्या प्रचंड संस्थेत त्यांचे रुपांतर झाले. " **मरावे परी किर्तिरूपें उरावे** " या संत वचनाप्रमाणें डॉ० वानलेस यांनीं आपल नांव वैद्यक क्षेत्रांत अमर केले.

आपण मला वेळ १५ मिनिटांचा दिला आहे. परंतू रोज १५ सांगितल्या तरी १५ दिवसांत संपणार नाहींत एवढ्या त्यांच्या आठवणी माझेजवळ आहेत.

सन १८९० पासून सन १८९९ अखेर मी मिरजेचा म्युनिसिपल सेक्रेटरी होतो. त्यामुळें माझा डॉ० साहेबांशी निरनिराळ्या प्रसंगी संबंध येत जाऊन त्याचे रुपांतर दृढ मैत्रीत होऊन त्यांचा माझेवरील लोभ अखेर पर्यंत कायम होता.

डॉ० वानलेससारख्या अद्वितीय कर्तबगार पुरुषाचे चरित्रामध्यें अष्टपैलू हिऱ्याप्रमाणें कोणत्याही बाजूनें पाहिले तरी सारखेच तेज दृष्टीस पडते.

उत्कृष्ट सर्जन ह्मणून त्यानी मिळवलेले यश व कीर्ति सर्व हिंदुस्थानांत

इतकी दुमदुमली कीं त्या बाजूचे वर्णन कोणी करणेचे कारणच उरलें नाहीं व तो विषय डॉक्टर मंडळीचा असल्यानें ते तो पाहून घेतील.

मी आजच्या सारख्या या गंभीर प्रसंगी त्यांच्या चरित्राची जी बाजू आठवणींच्या रुपाने आपल्या समोर मांडणेचा प्रयत्न करणार आहे ती बाजू ह्मणजे त्यांचे अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे कार्यकर्तृत्व ही होय.

**कर्मवीर डॉ० वॉनलेसः—**

डॉ० वॉनलेस हे खरे कर्मवीर होते. वायफळ बडबड त्यानीं कधीं केलीच नाहीं. काय करणार आहे याचा कधीं गाजावाजा केला नाहीं. तर ऐन-जिनसी कार्य करून दाखविलें.

तरुण पिढीला त्यांचे चरित्र आदर्शभूत होऊन राहील. ही संस्था स्थापन करीत असतां त्यांचेवर अनेक नाउमेदीचे प्रसंग आले, संकटे आली, विचित्र परिस्थितिमुळें मनाचा कोंडमारा झाला तरी सतत उद्योग व जबरदस्त महत्वाकांक्षा यामुळें त्यानीं आपली हिंमत कधींच खचू दिली नाहीं. मला येथें एक खुलासा करावासा वाटतो. बऱ्याच लोकांची एक समजूत असें "वानलेस साहेबास हो काय, अमेरिकेतून वाटेल तेवढा पैसा मिळत होता ह्मणून भराभर हॉस्पीटल वाढले" परंतू ही समजूत चुकीची होती. मिशन फंडातून पैसा मिळे परंतू तो फार माफक व तोही येथें काम करून त्याची उपयुक्तता पटवून दिल्यानंतर, त्यामुळें इमारतीचे सामान खरेदीपासून तो बांधणीपर्यंत प्रत्येक गोष्टीत ते अतिशय काटकसरीनें खर्च करीत.

एकदां सायंकाळीं मी त्याना भेटणेस गेलो असतां साहेब ऑपरेशन

रूममध्यें कांहीं कामात आहेत असे समजले ह्मणून तिकडे जाऊन दार ठोठावले व " मी साठे " असें मोठ्यानें सांगतांच साहेबानी हसत हसत दार उघडले, एका हातांत रंगाची वाटली व एका हातांत ब्रश घेऊन ऑपरेशन रूमचे छत व भींतीस ते स्वतः पांढरा रंग लावीत होते. मला पाहतांच " नो फंडस् साठे " असें उद्गारले. इमारतीचे बांधकाम सुरूं असतना मजुरांची हजेरी, पगाराचा बटवडा, कामाचे मोजमाप ते स्वतः करीत. उच्च दर्जाच्या शास्त्रीय ज्ञानाबरोबरच शारीरिक कष्ट करण्याचे शिक्षणही त्याना होतें तें आमच्या युनिव्हर्सिटी पदवीधरानीं अनुकरण करण्यासारखें आहे.

पवनचक्की, मोटार, गॅस, इलेक्ट्रिक मशीन यासारखीं सर्व कामें ते स्वतः पहात.

## मिरजेचा पहिला प्लेगः—

डॉ० वॉनलेस यांचे दवाखान्याचा लौकिक दिवसेदिवस वाढूं लागला. या सुमारास सन १८९८ मध्यें मिरजेस प्लेगची पहिली सांथ सुरूं झाली. या संसर्गजन्य रोगावर प्रतिबंधक उपाय काय व कसे करावे याची यथार्थ माहिती तेव्हां फारशी नसल्यानें सरकार सर्व प्रकारचे उपाय अमलांत आणीत होते व त्यांचा परिणाम पुणें, मुंबई प्रांति लेकांत असंतोष पसरण्यापर्यंत झाला. त्याचवेळीं दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांचे वाट्यास कर्नल रे हे पोलिटिकल एजंट ह्मणून अधिकारी होते.

या स्वारीचा कांहीं औरच खाक्या होता. प्लेग प्रतिबंधाच्या त्यांच्या कल्पनाही विलक्षण असत.

पत्रके, रिपोर्ट, तक्ते यांचा असा ससेमिरा त्यानीं सुरू केला कीं, ती माहिती पुरवतां पुरवतां नाकींनव यावे. मिरजेस प्लेगचीं चिन्हें सुरू होतांच श्रीमंत सर बाळासाहेब यांनीं समयसूचकतेने एक प्लेग कमीटी स्थापन करून तिचे अध्यक्ष डॉ० वॉनलेस यांस नेमून सर्वाधिकार त्यांस दिले. त्यामुळें रे साहेबास आळा बसला. प्लेगचे गांवातून आलेली डांकेतील पत्रें एका चाळणीवर ठेवून त्यास गंधकाची धुरी देऊन नंतर रे साहेब ती दुरून वाचीत. मिरज, सांगली, इचलकरंजी संस्थानांतून क्वारंटाईन होते, त्यातील रोग्यांचे टेंपरेचरचा तक्ता रोजचे डाकेने पाहणेस कोल्हपुरास पाठवावा असा विचित्र हुकूम ते देत. परंतू मिरजेस वॉनलेस साहेबाशी सामना दिसतांच स्वारी थंड झाली.

या भयंकर प्राणहारक साथींमध्यें स्वतःचे प्राण अनेक वेळ धोक्यांत घालून डॉ० वॉनलेस यानी एक पैचाही मोबदला न घेता जे श्रम केले ते मी त्यांचे बरोबर त्यावेळीं प्लेग कमेटीवर काम करीत असल्यानें प्रत्यक्ष पाहिले आहेत.

मिरज शहरांस त्यावेळीं असें भीषण स्वरूप प्राप्त झाले होते व जावे तिकडे असे रोमांचकारी देखावे नजरेस पडत कीं, त्याची आठवण मला अद्याप ताजी वाटते. निमजग्याचे माळापलीकडील पंढरपूर रस्त्यालगतचे माळावर प्लेग हॉस्पीटल व सेग्रीगेशन कँप उभारले होते व स्टेशननाजिक क्वारंटाईन कँप होता.

प्रथमतः डॉ० वॉनलेस व त्यांचे सहकारी डॉ० विल्सन यानीं स्वतःस प्लेग इनाक्यूलेशन करून घेतले व नंतर हॉस्पीटल स्टाफला केले.

त्यावेळीं इनाक्यूलेशनवर लोकांचा विश्वास नव्हता व त्याबद्दल निरनिराळे गैर समज पसरले होते ह्मणून मिरज शहरचे टाऊन हॉलमध्यें सार्वजनिक रीतीनें लोकांस जमवून, इनाक्यूलेशनचे फायदे समजावून देऊन उपक्रम करावा लागला. मिरजेत पहिले इनाक्यूलेशन मला केलें. नंतर बरेच लोक तयार झाले.

घरें धुणे, डिसइन्फेक्ट करणे, प्लेगचा रोगी कँपमध्यें पाठवणे वगैरे विविध प्रकारची कामें रात्रंदिवस करावी लागत व ती सर्व डॉ० वॉनलेस यांचे सूचनेंप्रमाणें मी करवीत असे. पुढें लोक प्रेतें घरांत लपवूं लागले व कित्येक घरांत तर बाहेरून कुलुपे लावून मरणोन्मुख अथवा मृत माणसास आंत एकटेच सोडून लोक पळून जाऊं लागले.

प्लेगने मृत झालेले व रोगी यानां उचलण्यास लोक मिळेनात. कित्येक प्रेतें एका बाजूस मी व दुसरे बाजूस डॉ० वॉनलेस अशी आह्मी दोघांनी उचलून घरातून बाहेर आणली आहेत. याप्रमाणें अविश्रांत मेहनत घेतल्यानें प्लेगचा जोर कमी होऊं लागला व अजमासे आठ महिन्यानी ही सांथ थांबली.

यावेळीं डॉ० वॉनलेस यांनी केलेली अमोलिक जनसेवा देवाघरीं रुजूं झाली व हाच त्यांच्या मिरजेतील भावी यशोमंदिराचा पाया होता.

**मेडिकल क्लास**—

डॉ० वॉनलेस यांची दुसरी महत्वाची कामगिरी ह्मणजे मिरज मेडिकल क्लासची स्थापना हॉस्पीटलचे कामास जोरात सुरवात होऊन काम

वाढूं लागले तशी असिस्टंट डॉक्टरांची जरूरी भासूं लागली यासाठीं त्यानी एक मेडिकल क्लास सुरूं केला. निरनिराळ्या मिशनमधून हिंदुस्थानातील सर्व भागातून ख्रिश्चन विद्यार्थी यांत येऊन शिक्षण घेऊं लागले. या विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर सुरुवातीपासूनच प्रत्यक्ष शिक्षण मिळत असे. दवाखान्यात भिकाजी मास्तरांचे हातांखालीं कंपाऊंडिंग शिकण्यापासून तो मोठमोठ्या ऑपरेशनमध्यें मदत करण्यापर्यंतची सर्व लहान मोठी जबाबदारीची कामें या मुलाना करावी लागत. साहजिकच हे विद्यार्थी इतर मेडिकल स्कूलसपेक्षां अधिक कार्यक्षम व तरबेज असत.

मिरज संस्थानची नोकरी सोडून श्रीमंत सर बाळासाहेब यांचे परवानगीने मी जमखंडी संस्थानचे मामलतीचे जागेवर गेलो व मिरजेहून लांब पडलो. तरी येथें माझें नेहमी येणेंजाणे होत असे.

परंतु सर विल्यम वॉनलेस साहेबाशी व त्यांचे संस्थेशी माझा संबंध पुढेंही अबाधित राहणेचे कारण हा मेडिकल क्लासच होय.

कारण अमेरिकेतून मिशन बोर्डास शिफारस करून स्पेशल परवानगी मिळवून पहिला नॉन ख्रिश्चन विद्यार्थी ह्मणून त्यानी माझे जेष्ठ चिरंजीव डॉ० मोरेश्वर यांस या क्लासात घेतले. मोरेश्वरवर त्यांचे फार प्रेम असे व मुंबईस ऑपरेशनसाठीं ते जात तेव्हां त्यास क्लोरो फॉर्मिस्ट ह्मणून नेहमी बरोबर नेत.

त्या कलेत मोरेश्वरने चांगलेच प्राविण्य मिळवले होते डॉ० वॉनलेस यांचे नजरेखालीं सहा हजारावर केसीसना त्यानें क्लोरोफॉर्म दिला आहे.

या क्लासला आतां सरकारचीही मान्यता मिळाली आहे. येथें M.B.B.S. कोर्सचे पूर्ण विश्वविद्यालयीन दर्जाचे मेडिकल कॉलेज सुरू करणेची त्यांची महत्वाकांक्षा होती. मुंबईचे ग्रँट मेडिकल कॉलेजातून पास झालेले कित्येक विद्यार्थी काम पाहणे व शिकणेसाठीं येथें येऊन रहात. त्याप्रमाणें माझा दुसरा चिरंजीव डॉ० बळवंत हा येथें दोन वर्षे होता. व त्याचे विनंतीवरूनच सर विल्यम यानीं मिरज हॉस्पीटलला मुंबई युनिव्हर्सिटीचे "**मास्टर ऑफ सर्जरी**" या उच्च पदवीचे "पोस्ट ग्रॅजूएट कोर्स"ची मान्यता मिळविली होती. मेडिकल क्लास संबंधी बोलतांना डॉ० वॉनलेस ह्मणत हिंदुस्थानांतील असंख्य खेड्यापाड्यातून गोरगरिबास औषधोपचार सुलभ मिळण्यास हॉस्पीटल असिस्टंट डॉक्टरांची जरूरी आहे. कॉलेजचे पदवीधर मोठमोठीं शहरें व जिल्ह्याच्या जागा या ठिकाणाकडे वळतात व खेड्यातील जनतेस चांगला डॉक्टर वाट्यांस येत नाहीं.

माझा क्लास असे डॉक्टर तयार करणेसाठीं मी सुरू केला आहे. त्यानां स्वतःचे विद्यार्थ्याबद्दल प्रेम व अभिमान वाटे आणि संस्थेतून जाण्यापूर्वी वैद्यकीय शिक्षणाबरोबरच चारित्र्य, शील व खरी जनसेवा याचे महत्व ते आपल्या विद्यार्थ्यांचे मनावर बिंबवीत असत. त्यांचे हाताखालीं शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांत डॉ० जोसेफ, ज्वरबिंदू गवंडे, डॉ० गोरे, डॉ० सम्यूएल, डॉ० लॅझरस, डॉ० साठे, डॉ० पॉल, डॉ० भातखंडे, डॉ० ओथनील, डॉ० सायमन, डॉ० चिंचलीकर वगैरेचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

संस्था नांवालौलिकास आणण्यास तिचा संस्थापक तर कर्तबगार

लागतोच परंतू तिचे इतर घटकावयव जे मदतनीस ह्मणून असतात त्यांचेही श्रम कारणीभूत होतात. वरील सर्व विद्यार्थी यांनीं वेळोवेळीं केलेले व रा. भिकाजी मास्तर व रा. नानाजी या जोडीचे चालू असलेले श्रम व लोकांत मिळून मिसळून वागून संस्था लोकप्रिय व कार्यक्षम करण्याकडे त्यानीं दिलेले लक्ष हें येथें नमूद करणे मी माझें कर्तव्य समजतो.

अमेरिकेतून डॉक्टर आले त्यांत डॉ० विल्सन हे जुन्यापिढीत व डॉ० व्हेल हे नव्यापिढीत फारच लोकप्रिय झाले. डॉ० गोहीन, फ्रॉस्ट, स्टीव्हन्स, केनी वगैरेनी येथें वेळोवेळीं राहून काम केले. त्यात स्वतंत्र संस्थेचे संस्थापक व गोवा प्रांताचे प्रतिवॉनलेस ह्मणून प्रसिद्ध असलेले वेंगुर्ल्याचे डॉ० गोहीन यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. एके प्रसंगी अमेरिकेस रजेवर जातानां सर्व मंडळीचा निरोप घेणेचे सभेत डॉ० वॉनलेस ह्मणाले होते, "डॉ० व्हेल हें एक रत्न आहे व तें मी तुमच्या स्वाधीन करून रजेवर जात आहे. त्यानां माझे इतकाच मान देऊन त्याशी सहकार्य करा."

हे शद्ब अक्षरशः खरे कसे आहेत ते तुह्मापैकीं प्रत्येकास स्वानुभवानेच माहीत आहे. अखेरचे प्रयाणापूर्वी मिरज हॉस्पीटलच्या कोंदणांत हें रत्न पूर्ण प्रभेने चमकतानां पाहून जाण्याचे भाग्य सर विल्यम यांस लाभले होते.

### मिशन हॉस्पीटल.

या संस्थेचा लौकीक सर्व हिंदुस्थानभर गाजला याचे सर्व श्रेय डॉ० वॉनलेस यांचे कार्यकौशल्य व अविरत श्रम यानांच आहे. सर्व

प्रकारची कुशल व अवघड शस्त्रक्रिया यशस्वी रीतीनें होण्याबद्दल या हॉस्पीटलची ख्याती आहे. डॉ० वॉनलेस यानीं या कामीं जे श्रम केले ते अद्वितीय होते. दुपारीं एक वाजल्यापासून रात्रीं दहा वाजेपर्यंत ते सारखे काम करीत. ऑपरेशन रूममध्यें लाईट लागल्याशिवाय ते कधीं खाली उतरलेच नाहींत. डोक्यावर व चेहऱ्यावर पांढरा 'मास्क' अंगात पांढरा शुभ्र 'एप्रन' व हातात रबरी हातमोजे घातलेली त्यांची धीर गंभीर आकृति मला अजूनही डोळ्यासमोर असल्यासारखी दिसत आहे.

बरोबर काम करणारी तरूण असिस्टंट मंडळीही थकून जात, परंतू यांचा उत्साह व तडफ कायम असे. पोटातील आतडी, जठर, पित्ताशय या वरील शस्त्रक्रिया फार अवघड समजली जाते व या सर्वांत ते अत्यंत निष्णात होते असें ह्मणतात. हिंदुस्थानांत शस्त्रक्रिया लोकप्रिय करण्याचे श्रेय सर्वस्वी त्यानांच असून, शस्त्रवैद्यांच्या भावी पिढ्यावर त्यांचे मोठे उपकार आहेत. कारण त्यांचेसाठीं डॉ० वॉनलेस यांनी क्षेत्र निर्मान करून ठेवले आहे.

त्यांचे वर्णन डॉक्टर लोक करतात ते असे, "डॉ० वॉनलेस सारखा अष्टपैलू सर्जन फार विरळा."

एकदां मी मुंबईचे विख्यात नेत्रवैद्य डॉ० डगन यांस भेटलो असतां ते ह्मणाले "वॉनलेस हे शस्त्रवैद्य, नेत्रवैद्य, स्त्रीरोग चिकित्सक सर्वच शाखांमध्यें फार श्रेष्ठ दर्जाचे आहेत." हिंदुस्थानच्या सर्व भागांतून रोगी ऑपरेशन करितां मिरजेस येत व कॉंग्रेस कॅंपप्रमाणें कोणत्याही

प्रांतातील प्रतिनिधी मिशन हॉस्पीटलमध्यें भेटत असे. परप्रांतीयांत कर्नाटक गुजराथ यांचा भरणा विशेष. मुंबईतील सुशिक्षित व धनाढ्य लोकही मिरजेस डॉ० वॉनलेस यांचेकडून ऑपरेशन करवून घेणेस येत एवढा लौकिक त्यानीं मिळवला होता.

सर चंदावरकर, सर भांडारकर, सर नरोत्तम, अदमजी पीरभाई, टाटा वाडिया, पेटीट कावसजी जहांगीर अशी बडी मंडळी व बडोदा, कोल्हापूर या राजघराण्यातील मंडळीही त्यांचेकडे येत.

कांहीं जणानी इमारती वगैरे रूपाने मोठ्या देणग्याही दिल्या आहेत. खुद्द मुंबई शहरातही जाऊन ऑपरेशन करीत. मुंबईसारख्या अव्वल दर्जाचे शहरी मोठमोठीं इस्पितळे व एवढे बडे डॉक्टर्स असून त्यांना पेशंट मुद्दाम बोलावून नेत. या हॉस्पीटलची बाल्यावस्थेपासून आतापर्यंतची वाढ मी पहात आलो आहे व याचे इंचइंचामध्यें डॉ० वॉनलेस यांचे श्रम व कर्तृत्व भरलेले मला दिसत आहे. एका माणसाचे हिंमतीवर एवढे कार्य होणे व ते सतत चालू राहण्यासारखी संस्था निर्माण होणे हें फार दुर्मिळ दृश्य आहे. डॉ० व्हेल सारखे त्याच तोलाचे सर्जन लाभल्यामुळें ही संस्था अखंड जनसेवा करीत राहील असा भरंवसा वाटतो.

**डॉ० वॉलनेस यांचे कौटुंबिक जीवनः—**

ईशकृपेनें डॉ० वॉनलेस या बाबतींत भाग्यवान होते. त्यांची प्रथम पत्नी मिसेस वॉनलेस ही एक आदर्श ग्रहिणी होती. त्यांचा स्वभाव फारच प्रेमळ व कष्टाळू असे. सुमारे १९०१ सालीं मिरजेस व दक्षिण भागांत दुष्काळ पडल्यावेळीं 'अमेरिकन हेरल्ड' या वर्तमानपत्रामार्फत अमेरिकेतून

शेकडो पोती मका गरीबास वाटणेसाठीं येथें आला त्याची वाहतूक जपानी बोटीनी मोफत केली होती. प्रत्यही दुष्काळग्रस्त लोकांस जमवून त्यांना हे धान्य वाटण्याचे काम मिसेस वॉनलेस स्वतः करीत. अखेर या बाईंचा अंत कॉलऱ्याने झाला. त्या वेळची हकीकत मला स्वतः डॉ० वॉनलेस यानीं अश्रु ढाळीत सांगितली. ते ह्मणाले "मी रात्रीं १२ पर्यंत हॉस्पीटलचे कामात गढून गेलो होतो व त्यानंतर झोपीं गेलो, पहाटे ४ वाजतां मिसेस वॉनलेस यांची धडपड ऐकून जागा झालो व पाहतो तों या भयंकर रोगाने त्यांना पूर्ण ग्रासले होते. मला आधींच कां कळवले नाहींस असें ह्मणतांच "तुह्मी दिवसभर कष्ट करून दमले भागले होता तेव्हां तुम्हास त्रास देऊं नये असें मला वाटले ह्मणून मी बोलले नाहीं." असें ह्मणाल्या. नंतरचे प्रयत्न अर्थातच निष्फळ ठरले."

या वरून या साध्वीचे थोर मनाची कल्पना येईल. त्यांची कबर मिरजेचे ग्रेव्हयार्ड मध्यें आहे.

त्यांचे एकच अपत्य एथेलबाई या अमेरिकेतील वैमानिक खात्यांतील एका अधिकाऱ्याच्या पत्नी असून सुखानें कालक्रमणा करीत आहेत. त्यांचे कुशलवृत्त प्रत्येक पत्रांतून डॉ. साहेब मला लिहीत. द्वितीय पत्नी लेडी वॉनलेस याही तशात सूज्ञ आहेत. डॉ. साहेबांचे आयुष्यांतील खऱ्या कष्टाचे व मेहनतीचे प्रथम भागाची साथ त्यांच्या प्रथम पत्नीने केली व वैभवाचा व सुखाचा दुसरा भाग लेडी वॉनलेस यांस मिळाला.

डॉ. वॉनलेस यांचे एक चिरंजीव वैद्यकाचे शिक्षण घेत असून दुसरे इलेक्ट्रिक इंजिनियर होत आहेत. एक कन्या आहे. ग्रेनडेल गांवीं

स्वतःचे घरीं ते हल्लीं रहात असत व बागेतील संत्र्यांचे झाडांची जोपासना करण्यात माझा वेळ जातो. असे त्यांनी मला लिहिले होते. एकदां डॉ. वॉनलेस यांचे वडील बरगडीचे हाडाचे कांहीं आजाराने बरेच आजारी झाले व त्यांनीं चिरंजीवास बोलावले. डॉ. वॉनलेस यानी अमेरिकेस रजेवर जाऊन आपले वडिलांचे ऑपरेशन स्वतः करून त्यांस बरे केले. आमचे शास्त्रीबुवा खरे विनोदाने ह्मणत "या मुलानें बापाची सुद्धां बरगडी मोडण्यास कमी केले नाहीं," त्यांच्या एका अल्पवयी बहिणीने आपल्या मृत्यूपूर्वी खाऊच्या पैशातून शिल्लक राखून ठेवलेली लहानशी रक्कम डॉ० वॉनलेस यांस 'लहान मुलांसाठीं दवाखाना' बांधण्यांस दिली होती ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे, पुढें हजारोंनी मोजण्यासारख्या देणग्या या संस्थेस मिळाळ्या तरी सर्वात ही जिव्हाळ्याची देणगी डॉक्टरसाहेबास बहुमोल वाटत असे. या बहिणेचे नांवाचा "मुले व स्त्रिया यासाठीं वॉर्ड" त्यांनीं प्रथम बांधला.

## राहणी व स्वभाव—

डॉ० वॉनलेस यांची राहणी फार साधी असे. ते बहुतेक पांढरे सूट वापरीत. अलीकडे क्वचित रेशमी सूट ते वापरीत. जेवणखाण साधेच असून कित्येक वेळा त्यानां जेवणास फुरसत नसे. दारूचे थेंबासही कधीं ते शिवत नसत व औषध ह्मणूनही दारू घेणेचे कारण नाहीं असे ते सांगत. उन्हाळयांत दाक्षिणेतील कोडीकॅनाल या थंड हावेचे ठिकाणीं रजेवर जाताना सर्व कुटुंबासह तिसऱ्या वर्गातून प्रवास करीत असतां मला कुंदगोळ स्टेशनवर पुष्कळ वेळां भेटले आहेत. नोकर चाकर या लवाजम्याची त्यानां कधींच जरूर भासली नाहीं. मुंबईस ताजमहाल हॉटेलमध्यें एकदां भेटण्यास गेलो, वेळ दुपारची होती. बाहेर कोणी पेशंटही

बसले नव्हते. खोलीत जाऊन पाहतो तो डॉ० साहेब स्वतःच बुटांचे जोडास पॉलीस करीत होते. मिरजेस प्लेग कमिटीच्या सभा टाऊन हॉलमध्यें रात्रीं ९ ते १२ भरत, तेव्हां आह्मी कमेटीवरील संस्थानी अधिकारी ह्मणून येत असूं व आमचे प्रत्येकाचे बरोबर एकेक कंदीलवाला पट्टेवाला असे. डॉ० वॉनलेस व डॉ० विल्सन हे मात्र एका हातांत बांबूची उंच कांठीं व एका हातात कंदील असे हॉस्पीटल पासून पायीं येत. मी त्यानां कंदीलवाला बरोबर देतो असें सांगताच डॉ० वॉनलेस ह्मणाले नोकर माणसे मजकडे आहेत परंतू असल्या क्षुल्लक कामाकरितां मी एक नोकर तीन तास अडवून ठेवूं इछित नाहीं. तेवढ्या वेळांत तो दुसरे कांहीं उपयुक्त काम करील. या साध्या गोष्टीवरून त्यांची नजर किती सूक्ष्म होती हे ध्यानीं येईल. रात्रीं हॉस्पीटलमध्यें पहारेवाला असे, त्याने रात्रभर झोपूं नये व कांहीं कामही करावे ह्मणून पाटीभर धुतलेली बँडेजेस गुंडाळून ठेवण्याचे काम त्याला लावून दिलेले असे. काटकसर हा त्यांचा मोठा गुण होता व एवढी संस्था चालविणेस तो अवश्यक होता.

**स्वभाव—**

डॉ० वॉनलेस हे अत्यंत कष्टाळू व चिकाटीचे गृहस्थ होते. त्यांची महत्वाकांक्षा फार मोठी होती व आत्मविश्वास जबरदस्त होता. यामुळें त्यांनीं पुढें टाकलेले पाऊल कधीं मागे घेतलेंच नाहीं.

सर्व नव्या सुधारणा आपल्या संस्थेत पाहिजेत सर्व नवी ऑपरेशन्स मिरज हॉस्पीटलमध्यें झालीच पाहिजेत अशी त्यांची महत्वाकांक्षा असे.

मिरजेस प्रत्येक नवीन गोष्टीचा उपक्रम त्यांचे कडून झालेला आह्मी

पाहिला. मिरजेत पहिली सायकल, पहिली मोटार, पहिली पवनचक्की, पहिली विजेची रोषणाई व अगदीं अलीकडील म्हणजे मिरजेस स्थानिक पाण्याचा पुरवठा कमी पडल्याने त्यानीं स. म. रेल्वे एजेन्ट मार्फत मिरज रेल्वे स्टेशन स्टोअरमधून पहिले नदीचे पाण्याचे नळ सर्व त्यानीच प्रथम आणले.

डॉ० वॉनलेस यांचा स्वभाव मानधन होता ते दुसऱ्याच्या आहारी कधीही न जातां नेहमी आपली छाप प्रथम त्याच्यावर पाडीत. रोग्याशी प्रेमळ पणाने परंतू फार थोडे बोलत व डॉक्टर लोकानी शिकण्यासारखी गोष्ट म्हणजे ते आपले मत व रोग्याचे घेणेचे औषध व पथ्यपाणी यांचे अनुपान गंभीर व निश्चित शद्बांत देत. याचा रोग्यावर फार चांगला परिणाम होई. नाहींतर रोग्याचे भिडेखातर "हां हेहीं खा, ते ही चालेल" असें ते करत नसत. स्वतः आतिशय श्रम करीत व हाताखालचे लोकांकडून करूनही घेत. सण, वार, नाताळ कांहींही असो त्यांचे उद्योगास खंड पडत नसे. परंतू यावरून त्यांचा स्वभाव रूक्ष होता असें समजू नका, ते फार आनंदी व खेळाडू वृत्तीचे होते. इतके सर्व व्याप संभाळून टेनीस, शिकार, फोटोग्राफी वगैरे त्यांचे करमणुकीचे प्रकार असत व टेबलावर वैद्यकीय ग्रंथाबरोबर एकादे इंग्रजी कवितेचे पुस्तकही असे.

त्यांचा स्वभाव सारखा तापट व कडक होता व तो वय मानाने थोडासा वाढला होता तरी ते अंतःकरणाचे दयाळू व दिलदार होते. हाताखालचे विद्यार्थी व नोकर यांचेकडून कित्येकवेळा चुका होत व कांहीं तर अक्षम्य अपराधही करीत तरी ते पोटांत घालून त्यानां संभाळून घेत अशी कित्येक उदाहरणे दाखवता येतील. अनेक प्रकारचे लोक व त्यांचे

स्वभाव यांशीं संबंध येऊन त्यानी अनुभवजन्य ज्ञान पराकाष्ठेचे मिळविले होते. त्यास मनुष्य स्वभावाची पारख होती. खासगी संभाषणांत ते मार्मिक विनोद करीत. या हॉस्पीटलशिवाय लेपर असायलम ही संस्था रे. रिचर्डसन यांचे देखरेखेखालीं अनेक वर्षे उपयुक्त काम करीत आहे. डॉ. वॉनलेस या संस्थेचे वैद्यकीय सल्लागार होते. त्यांस **इंग्रज-सरकारकडून** प्रथम "**कैसर ई हिंद** या मानाचीं चांदी, सोन्याची २ पदकें मिळाली व त्यांस १९२८ मध्यें **नाईट** ही मानाची पदवी मिळाली.

त्यांची अखेरची संस्मरणीय कामगिरी म्हणजे सर विल्यम ट्यूबर-क्युलोसीस सॅनिटोरियम या संस्थेची स्थापना ही होय. क्षयरोग्यासाठीं अशी कांहींतरी सोय असावी अशी त्यांची फार दिवसांची इच्छा होती. जुन्या हॉस्पीटलला जोडून एक मोकळा वार्डही त्यानी बरीच वर्षे सुरूं केला होता. परंतु त्यांचे इतर कामाचा व्याप मोठा व आर्थिक परि-स्थितीचे चक्रात नेहमीच सांपडलेला हा देश आतांतर जास्तीच खालावत चालला त्यामुळें फंड, देणग्या, मदत मिळविणे फार कठीण झाले, तरी या कल्पनेस मूर्त स्वरूप देणेचा त्यानीं निश्चय केला व आपल्या नेहमीचे धडाडीनें पार पाडला. महाराष्ट्रास अशा संस्थेची अत्यंत जरूरी आहे व ही संस्था लोकप्रियता संपादून मोठे कार्य करून दाखवील अशी आशा आहे.

आपण मनांत योजलेली बहुतक कार्यें आपल्या देखत सिद्धीस गेल्याचे पाहण्याचे भाग्य फारच थोड्यास लाभते व ते सर विल्यम यांस लाभले असे मला वाटते. बाकी त्या महान् उद्योगी पुरुषाचे मनांत

आणखी किती तरी कल्पना असणेचा संभव होता.

तारीख ९ एप्रील १९३१ रोजीं मुंबई बंदरांतून त्यांनीं लेडी वॉन्-लेस व कन्या यासह अखेरचें प्रयाण केलें तेव्हां त्यांस निरोप देणेसाठीं मी व डॉ॰ जोसेफराव पवार हजर होतो, तो दिवस मला आठवतो.

आपण माझें भाषण कृपाकरून शांतपणें ऐकून घेतलें याबद्दल मी आपला आभारी आहे.

सर विल्यम यांचे चरित्र तरुणास सर्व प्रकारें आदर्शयुक्त आहे. पवित्र चारित्र्य, उत्तम शील, सतत उद्योग, प्रखर बुद्धिमत्ता, शारीरिक व मानसिक श्रम करणेचें अचाट सामर्थ्य वगैरे लोकोत्तर गुण त्यांचे आंगी होते. त्यांचे चरित्ररूपी वाङ्मय स्मारक होणें अत्यंत इष्ट आहे व आपली 'युनाइटेड चर्च ऑफ नॉदर्न इंडिया' मंडळी या कामीं पुढाकार घेऊन मराठी भाषेंत त्यांचे चरित्र छापील तर त्याकामीं मी यथाशक्ति मदत मोठ्या आनंदानें करणेस तयार आहे हे कळविणेची परवानगी घेतो.

सर्व मंगल सर्व समर्थ जगच्चालक प्रभू या थोर विभूतीचे पवित्र आत्म्यास चिरशांती देवो अशी त्याचे चरणाजवळ प्रार्थना करून मी आपली रजा घेतो.

कोटा जंक्शन,
राजपुताना.
B. B. & C. I. Ry.
सोमवार, ता. २०
मार्च १९३३

त्र्यंबक नारायण साठे.
**T. N. SATHE.**
माजी म्युनिसिपल सेक्रेटरी,
शहर म्यु. मिरज वगैरे,

# ख्रिस्त विलीन डॉ० सर वुइल्यम जे वॉन्लेस यांच्या स्मरणार्थ.

---

( चाल:—काहींसें—मरणच मेलें. )

दु:ख बहु झालें ।
जणूं पर्वत शिखर कोसळलें ।। धृ० ।।

संकट दु:ख बहू सोशिलें ।
सत्सौख्यें परि दूर सारिलें ।
जनसेवेच्या कार्या केलें ।
भक्तच दडले । जणूं पर्वत शिखर कोसळलें ।। १ ।।

आयू सारे ह्यांत झिजविलें ।
पंगु दीन धनिका वाहिलें ।
ख्रिस्त प्रीतिचें कार्य साधिलें ।
सेवक निजले । जणूं पर्वत शिखर कोसळलें ।। २ ।।

नच आतां जरी दृष्टिस पडले ।
अविनाशी स्थळीं जाउन बसले ।
कीर्ति रुपानें उभें ठाकले ।
येथेंच लपले । जणूं पर्वत शिखर कोसळलें ।। ३ ।।

ईश्वर बापा सर्व समर्था ।
वृद्धिंगत कर त्यांच्या कार्या ।
सांभाळीं लेंकरें व भार्या ।
स्वर्गीं ते रमले । जणूं पर्वत शिखर कोसळलें ।। ४ ।।

मिरज.
ता. २४-३-१९३३

रामचंद्र दत्तात्रय सिंहासने.

मुद्रक व प्रकाशकः– हें पुस्तक सांगली येथें शांताराम अनंतराव यंदे यांनीं घर नंबर १९७ गणपती पेठेंत आपल्या यशवन्त स्टीम प्रिंटिंग प्रेसमध्यें छापिलें आणि ते– डॉ. सी. ई. व्हेल .एम्. डी.एफ्.ए.ई.एस्. फिजिशियन् इन्चार्ज अमेरिकन, प्रेसबिटेरियन मिशन हॉस्पिटल मिरज, येथें प्रसिद्ध केले.